30/9/14 Library L-II Marathi
NO10AAP F.Y.B.A

वेळ : २.५ तास गुण: ७५

---

प्रश्न १ अ) 'निवडक मराठी कथा' या कथासंग्रहातून ग्रामीण संस्कृतीचे सूक्ष्म दर्शन कोणत्या प्रकारे घडते, ते सविस्तर लिहा. (१५)

किंवा

ब) कथा या वाङ्मय प्रकाराचे घटक सांगून 'निवडक मराठी कथा' या कथासंग्रहातील कथांचे वेगळेपण कोणकोणत्या घटकांत आहे, ते सोदाहरण स्पष्ट करा.

प्रश्न २ अ) स्वत:च्या अस्तित्वाची जाणीव झालेल्या आधुनिक स्त्रीच्या संवेदनशीलतेचे दर्शन 'निवडक मराठी कथा' या कथासंग्रहातील कथांमध्ये कसे घडते ते सविस्तर स्पष्ट करा. (१५)

किंवा

ब) जीवन जगण्यासाठी संघर्ष कराव्या लागणाऱ्या दलित समाजाचे दु:ख 'निवडक मराठी कथा' या कथासंग्रहातील कथांमधून कसे प्रगट झाले आहे ते साधार लिहा.

प्रश्न ३ अ) मराठी लेखनाचे नियम वापरुन खालील शब्द शुध्द करुन लिहा (कोणतेही आठ) (८)

| | | | |
|---|---|---|---|
| १) तज्ञ | २) गोकुळ | ३) हुषार | ४) हिशोब |
| ५) सक्रीय | ६) व्यंगचित्र | ७) प्राविण्य | ८) वधुवर |
| ९) लवचिक | १०) महात्म्य | ११) बक्षिस | १२) फलद्रुप |
| १३) पढिक | १४) निलकंठ | | |

ब) खालील विषयावर ६० ते ८० शब्दात वर्तमानपत्रासाठी बातमी तयार करा (७)

१. जोशी-बेडेकर महाविद्यालयात कवी माधव डोळे, कवी मधुकर आरकडे, कवयित्री लीला शहा यांच्या हस्ते मराठी वाङ्मय मंडळाचे उद्घाटन झाले.

प्रश्न ४ अ) खालील उताऱ्याचे मराठीत भाषांतर लिहा (८)

Each and every citizen of India must work hard and save and invest. They should cultivate that habit of saving. If each Indian saves one paise every day it will mean a national saving each month of more than fifteen crores. Saving leads to new investments which, in turn boosts up production by leaps and bounds. An honest and hard working population is more than enough to make good foreign aid.

ब) ठाण्यातील एका वृत्तवाहिनीसाठी 'वृत्तनिवेदक' पदासाठी अर्ज तयार करा. (७)

NOIOAAP

प्रश्न ५ अ) एका वाक्यात उत्तरे लिहा (कोणतेही पाच) (१०)

१) दिवाकर कृष्ण केळकर यांनी लिहिलेल्या पहिल्या कथेचे नाव लिहा.

२) यंत्रशाळेत शिकण्यासाठी अशोक कोणत्या शहरात जातो ?

३) विभावरी शिरुरकरांचे खरे नाव काय ?

४) 'संस्कार' या कथेच्या नायिकेचे नाव लिहा.

५) 'वासरूं' कथा कोणी लिहीली आहे.

६) 'वळीव' कथेच्या नायकाचे नाव लिहा

७) 'भुताचा जन्म' कथेतील भूत सोनाराला काय आणून देत असे ?

८) 'लग्न संपल्यावर' कथेच्या लेखिकेचे नाव लिहा.

ब) योग्य पर्याय निवडून उत्तरे लिहा. (५)

१) बोलणाऱ्याच्या तोंडचे शब्द जसेच्या तसे लिहिताना कोणते चिन्ह वापरतात ?

अ) दुहेरी अवतरण चिन्ह आ) प्रश्नचिन्ह

इ) अपसारण चिन्ह ई) उद्‌गारवाचक चिन्ह

२) खालीलपैकी कोणते चिन्ह अपूर्णविराम दाखवते ?

अ) ; आ) ?

इ) ! ई) :

३) विधान पूर्ण झाले की कोणते चिन्ह वापरतात ?

अ) पूर्णविराम आ) अर्धविराम

इ) स्वल्पविराम ई) प्रश्नचिन्ह

४) एकाच जातीचे अनेक शब्द लागोपाठ आल्यास कोणते चिन्ह वापरतात ?

अ) , आ) ?

इ) ! ई) -

५) प्रश्नार्थक वाक्याच्या शेवटी कोणते चिन्ह वापरतात ?

अ) - आ) !

इ) ? ई) ;

❄❄❄